**मे.इकॉनॉमिक एक्सप्लोसिव्ह या कंपनीद्वारे सावंगा, पो.शिवा, ता.नागपूर (ग्रा.), जि.नागपूर येथे प्रस्तावित स्फोटके आणि संरक्षण उत्पादनांसह विद्यमान स्फोटक उत्पादनांच्या विस्तारीकरण प्रस्तावित प्रकल्पाची दि. १२/०६/२०२५ रोजी घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

*******

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ अन्वये मे.इकॉनॉमिक एक्सप्लोसिव्ह या कंपनीद्वारे सावंगा, पा.शिवा, ता.नागपूर (ग्रा.), जि.नागपूर येथे प्रस्तावित स्फोटके आणि संरक्षण उत्पादनांसह विद्यमान स्फोटक उत्पादनांच्या विस्तारीकरण प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक १२/०६/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्पाचे स्थळ मे.इकॉनॉमिक एक्सप्लोसिव्ह या कंपनीद्वारे सावंगा, पो.शिवा, ता.नागपूर (ग्रा.), जि.नागपूर येथे श्री. प्रविण माहिरे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्री. किशोर पुसदकर, उप-प्रादेशिक अधिकारी हे प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ यांचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य म्हणून उपस्थित होते व श्री. सुशिलकुमार राठोड, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी समन्वयक म्हणून काम केले व अध्यक्षांच्या संमतीने सकाळी ११.०० वाजता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या नागरीकांच्या नावांची यादी सोबत जोडली आहे. **(सहपत्र-१).**

## प्रयोजन व कार्यपध्दती

उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम मा.अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जन सुनावणी समिती यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी प्रकल्पाला परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी अथवा लेखी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे असे नमुद केले. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक ०९/०५/२०२५ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक सकाळ (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे असे कळविले. वृत्तपत्रांत प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२).**

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तसेच प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या संक्षिप्त अहवाल (इंग्रजी व मराठी मध्ये) व इतर माहिती असलेले कागदपत्रे विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात ३० दिवसापूर्वी नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत एकुण २ निवेदन म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झाले असुन प्रत सोबत जोडण्यात येत आहे **(सहपत्र-३).** मंडळाचा आदेश क्र. ई-४३/२०२५ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-250520-FTS-0158 dtd. 20/05/2025 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे **(सहपत्र-४).**

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार मराठी भाषेत प्रस्तावित स्फोटके आणि संरक्षण उत्पादनांसह विद्यमान स्फोटक उत्पादनांच्या विस्तारीकरणासाठी पर्यावरण विषयक बाबींबाबत प्रकल्प परिसर, प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ, प्रस्तावित सुविधा, अग्निशामक सुविधा, प्रक्रियेचे विवरण, वातावरणाची माहिती आणि अपेक्षित परिणामांची पडताळणी, जमिनीवरील घटक, वातावरण व हवामान, हवेतील घटक, परिसरातील हवेचा दर्जा, आपत्ती व्यवस्थापन योजना, हवा प्रदूषणाचे स्त्रोत, ध्वनी घटक, जल घटक, उपलब्ध पाण्याचा दर्जा, पाण्याचा वापर, सांडपाण्याची निर्मिती, जैविक घटक, सामाजिक आणि आर्थिक घटक, स्थानिक मूलभूत सोयीसुविधांवर होणारा परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन योजना, हवेतील उत्सर्जन, सांडपाणी व्यवस्थापन, वनीकरण कार्यक्रम, काळजी व्यवस्थापन आणि परिक्षण या बाबींवर सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर-२ यांनी उपस्थितांना सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, असे आव्हान केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री. विलास दिगांबर उईके, सावंगा (शिवा), ता.नागपूर (ग्रा.), जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | या उद्योगाने रोजगार वाढीसाठी काम केलेले आहे. आजूबाजूच्या गावांना रोजगाराचा फायदा झालेला असून पुढे १५०० लोकांना रोजगार मिळणार आहे. तसेच उद्योगांने आतापर्यंत पर्यावरण विषयक नियम पाळले आहेत. यापुढेही पाळतील याची खात्री आहे. प्रकल्पास समर्थन दर्शविला. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

**२) श्री. छत्रपाल राऊत, देवळी (काळबांडे), ता.नागपूर (ग्रा.), जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | या कंपनीत स्फोटके निर्माण होत असून रोज स्फोटकाची चाचणी घेतली जाते. मिसाईल टेस्टींग व कचरा जाळल्यामुळे धुळ झाडांवर, शेतपीकांवर बसते व लोकांच्या पोटात देखील जाते. त्यामुळे नागरीकांच्या आरोग्यांवर परिणाम होतो. याकरीता काय व्यवस्था करणार. | यावर प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, कंपनीमध्ये निर्माण होणारे उत्पादने देशाच्या सुरक्षेसाठी वापरात येत असल्यामुळे त्यांची चाचणी करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर चाचणी अत्यंत लहान प्रमाणात घेतली जाते व भारत सरकार यांनी प्रमाणित केलेल्या निकषांच्या आधारावरच घेतली जाते. ध्वनी प्रदूषण विहित मानकांच्या मर्यादेमध्ये असते. तरी यावर उपाययोजना करण्यात येईल. तसेच याबाबत पेसो व एमपीसीबी यांचेकडुन अटी व शर्तीयुक्त संमतीपत्र घेतलेले आहे. उद्योगामार्फत नियमीतपणे गावांत आरोग्य शिबीर घेतले जाते व कोणाला तात्काळ आरोग्य सुविधांची गरज असल्यास त्यांनी कंपनी व्यवस्थापकांना संपर्क साधावा. |

| | | |
|---|---|---|
| २ | कंपनीमुळे लोकांना फायदा झाला परंतु धोकाही वाढलेला आहे. नुकतेच भारत-पाकिस्तान युध्द झाले. पुढे चालून पाकिस्तान, चीनचा डोळा आपल्यावर असेल व एखादा मिसाईल येऊन भारी नुकसान होऊ शकतो. असे घडू नये यासाठी उपाययोजना करावी. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |
| ३ | लोकांची शेती घेणार काय? शिवा-सावंगा लोकवस्ती उठवणार काय? कंपनीने ही गांवे दत्तक घेवून मदत करावी. | जमीन अधिग्रहण भूधारकांची संमती घेऊन व सर्व परवानग्या प्राप्त करूनच झालेले आहे. गांवे दत्तक घेण्यास प्रयत्न करणार. |

**३) श्री. निलेश भाजीखाये, सावंगा, ता.नागपूर (ग्रा.), जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | विस्तारीकरणाचा टीएनटी प्लांट गावाजवळ असलेल्या झोपडपट्टीला लागून आहे. उद्योगाने पर्यावरणाची काळजी घेतली आहे. विस्तारीकरणामुळे जल प्रदूषण गावांत मुरणार आहे. त्यामुळे शेतातील विहिरी, पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत खराब होवू शकते व मानवी आरोग्यास धोकाही निर्माण होवू शकतो. | टी.एन.टी. विभागात कमी प्रमाणात सांडपाणी निर्माण होते. त्यामुळे जल प्रदूषण होणार नाही, याकरीता कंपनीने एमईई व शुन्य निकषन प्रणाली (ZLD) ही यंत्रणा बसविलेली आहे. |
| २ | उद्योगाने टी.एन.टी. च्या भागातील गावाचे पुनर्वसन करावे. तसेच १० कि.मी. परिसरातील गावांना दत्तक घेवून कंपनीने मदत करावी. | पुनर्वसनाबाबत व गांवे दत्तक घेण्याबाबत शिबीर घेवून व भेट देवून निर्णय घेण्यात येईल. |
| ३ | प्रस्तावित विस्तारीकरणासाठी कंपनीला ग्रामपंचायत ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता आहे किंवा नाही? | प्रस्तावित विस्तारीकरणासाठी वेगवेगळ्या विभागाच्या परवानग्या घेतलेल्या असून, बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ग्रामपंचायतची परवानगी घेण्यात येईल. |

**४) श्री. सचिन दुंगे, कोंढाळी, जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | कंपनीच्या विस्तारीकरणामुळे गावांतील लोकांना रोजगार मिळेल. अगोदर जे कंपनीमध्ये कार्यरत आहेत त्यांच्यामुळे गावकरी लोकांचे किराणा दुकाने, इतर उद्योग निर्भर आहेत. तसेच लोकांना उद्योगधंदे, व्यवसाय करायला मिळेल. प्रकल्पास समर्थन दर्शविला. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

**५) श्री. नारायण सावे, शिवा, ता.नागपूर(ग्रा.), जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | कंपनीमुळे शिवा-सावंगा गावांतील तसेच १०० कि.मी. पसिरातील लोकांना रोजगार मिळालेला आहे व गावाचा विकास झालेला आहे. तसेच इतर उद्योगधंदेही जसे किराणा दुकाने, भाडेकरूमुळे भाडे मिळत आहे. कंपनीमुळे नुकसान काही झालेले नाही. उलट गावांना फायदाच होत आहे. प्रकल्पास समर्थन दर्शविला. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

६) श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरण तज्ञ.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | प्रकल्पास समर्थन दर्शविला, रोजगार मिळेल, प्रदूषण नियंत्रणात ठेवावे. मोठ्या प्रमाणात परिसरात वृक्ष लागवड करावी व पावसाचे पाणी गोळा करून जलपूर्नभरण (Rainwater Harvesting) उभारावे. प्रकल्पाचे स्वागत आहे. गावांकरीता कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी घ्यावी (CSR). रोजगारांना कौशल विकासासाठी प्रशिक्षण केंद्र उभारावे. तसेच या प्रकल्पास विना अटी व शर्तीसह परवानगी मिळावी. | कौशल विकासासाठी समिती नेमून पुढील कार्यवाही करण्यात येईल.<br>कंपनीद्वारे कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (CSR) मार्फत आसपासची गांवे जसे बाजारगांव, शिवा, सावंगा येथे साफसफाई, आरोग्य व शिक्षण याबाबत कार्य करण्यात येते. |

७) डॉ.हेमंत देशमुख, सावंगा, ता.नागपूर(ग्रा.), जि.नागपूर.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | हवेचे प्रदूषण वाटत नाही पण मागील ६-७ वर्षापासून शेती पिकत नाही, यावर कंपनीची उपाययोजना काय? थोडेफार नुकसान जरी असले तरी कारखान्यामुळे भरभराटी मिळाली. आजच्या घडीला पाण्याचे प्रदूषण नाही पण पुढे प्रदूषण होणार नाही, याची शाश्वती काय आहे. | कंपनीमार्फत जल प्रदूषणाकरीता एमईई व शुन्य निकषन प्रणाली (ZLD) ही यंत्रणा बसविण्यात येणार आहे. |
| २ | रोजगार मिळालेला असून उपजिवीकेची साधनही मिळाले. कंपनीने गावास मदत करावी. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

८) श्री. पी.एस.भान, सेवानिवृत्त, भा.पो.से.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | सावंगा गावामध्ये आरडीएक्स एक्सप्लोसीव्ह तयार होतो. त्यामुळे हे गांव सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील आहे. मला कंपनीने गावांतील युवकांना आपातकालीन व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणाच्या कामाकरीता परवानगी दयावी. | कंपनी व्यवस्थापकामार्फत आपणांस संपर्क करण्यात येईल व तदनंतर पुढील बाबीबाबत विचार करण्यात येईल. |

९) श्रीमती.भाग्यश्री भाजीखाये, सरपंच, ग्रा.पं. सावंगा, ता.नागपूर(ग्रा.), जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | कंपनीच्या विस्तारीकरणामुळे रोजगार मिळाला व गावाचा विकास होतोय. कंपनीजवळ झोपडपट्टी प्रस्तावित प्रकल्पाला लागुनच असल्याने प्रभाव होवू शकतो. यावर कंपनीने काळजी घ्यावी. | परिसरात कुठलाही प्रभाव होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. |

..५/-

**१०) श्री.संजय बांते, बाजारगांव, ता.नागपूर(ग्रा.), जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | या कंपनीमुळे ५००० लोकांना रोजगार मिळतो, गावाची प्रगती होते. तसेच या कंपनीमुळे कोणतेही नुकसान नाही. विस्तारीकरणास मंजुरी दयावी. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

**११) श्री.विरेन्द्र पाली, बाजारगांव, ता.नागपूर(ग्रा.), जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | यांनी प्रकल्पास समर्थन दर्शविला. | मुद्द्यांची नोंद घेण्यात आली. |

**१२) श्री. आकाश भाजीखाये, सावंगा, ता.नागपूर(ग्रा.), जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | या परिसरात वाघांचा वावर वाढला असल्याने भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. वन्यप्राण्यांची व्यवस्था करण्यात यावी. नुकसान झाल्यास मदत करावी. | यावर योग्य ती उपाययोजना करण्यात येईल. |

श्री. प्रविण माहिरे अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर, यांनी उपस्थितांना संबोधले की, ही पर्यावरण विषयक जनसुनावणी असल्याने पर्यावरण विषयक मुद्दे उपस्थित करावे.

श्री.सुशिलकुमार राठोड, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर-२ यांनी उपस्थित जनसमुदायास त्यांचे काही आक्षेप, सूचना व टिका-टिप्पणी असल्यास सांगावे असे आव्हान केले. तसेच जर कुणाच्या लेखी नोंदी असतील त्यांनी समितीकडे जमा करण्याबाबत सुचित केले. उपरोक्त नागरीकांनी सुचित केलेले मुद्दे तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे यांची नोंद घेवून शासनाकडे पाठविण्यात येईल.

मा.अध्यक्षांच्या परवानगीने सदर पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर केले.

(किशोर पुसदकर)
सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर यांचे प्रतिनिधी

(सुशिलकुमार राठोड)
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर-२

(प्रविण माहिरे)
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर